सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्र.- १०१९(१)/२०२०/१४-ब** **दिनांक २४ ऑगस्ट, २०२१**

# सहायक मोटार वाहन निरीक्षक (पूर्व) परीक्षा- २०२०
## जाहिरात क्र. ०२/२०२०
## -:प्रसिध्दीपत्रक :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १५ मार्च, २०२० रोजी घेण्यात आलेल्या सहायक मोटार वाहन निरीक्षक (पूर्व) परीक्षा-२०२० चा निकाल **दिनांक २४ ऑगस्ट,२०२१** रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात आला आहे. पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी विहित कालावधीत मुख्य परीक्षेसाठी अर्ज करणा-या व परीक्षा शुल्क भरणा-या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. अशा तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.विचाराधीन पदाच्या खेळाडू आरक्षित पदाकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांच्या क्रिडाविषयक दाव्यांची/कागदपत्रांची वैधता तपासण्याच्या अधीन राहून मुख्य परीक्षेकरीता केवळ तात्पुरता प्रवेश देण्यात आला आहे.

**३.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**४.** प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस. व्दारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पध्दतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरिता स्वीकारार्ह ठरतील.

**ठिकाण:- मुंबई**

**उपसचिव (परीक्षा- २)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**